सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ४ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि,
नाव – शिवशंकर पुरणलाल मुळे,
वय – ३४ वर्ष, व्यवसाय – शेतमजूरी,
राह. – ढोलमारा, ता. मौदा, जिल्हा नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री. बी. एम. भगत द्वारा –**

१. मी दोन्ही आरोपींना ओळखतो. आरोपी क्र.१ माझ्या मोठ्या भावााचचा साडू आहे व आरोपी क्र.२ माझा सख्खा मोठा भाऊ आहे. फिर्यादी माझी पत्नी आहे. सदरची घटना अंदाजे ७ ते ८ वर्षापूर्वी सायंकाळी ०६.०० ते ०७.०० वा दरम्यान माझ्या प्लॉटवर घडली आहे. मी सरकारकडे पैसा भरल्यानंतर मला प्लॉट देण्यात आला होता. त्यानंतर माझी पत्नी व मी कामा निमित्त गुजरात राज्यात गेलो होतो. त्यानंतर ३ ते ४ महिन्यांनी आम्ही परत आमच्या मूळ गावी आलो. आम्ही परत आलो तेव्हा आम्हाला दिसले की, आरोपी क्र.१ माझ्या प्लॉटवर कब्जा करून तेथे झोपडे तयार करून राहत होता. मी त्याला सांगितले की, 'हे माझे प्लॉट आहे, तु येथे कसा काय राहत आहे'. त्यानंतर आरोपी मारहाण करण्यसाठी माझ्या अंगावर धाऊन आला. त्याने माझ्या विरोधात पो.स्टे. ला रिपोर्ट दिली होती. पोलीसांनी मला अटक केली होती तेव्हा माझी पत्नी एकटीच घरी होती.

२. मी दुसऱ्या दिवशी परत घरी आलो असता मला माझ्या पत्नीने सांगितले की, आरोपीने तिच्या कानावर हाताने मारहाण केली आहे. माझ्या पत्नीने सदर घटनेची फिर्याद पो.स्टे. ला दिली होती. पोलीसांनी माझे बयाण घेतले होते. आज रोजी आरोपी रामदास करकाळे न्यायालयात हजर आहे. आरोपी सदाशिव पुरणलाल मुळेचा मृत्यू झाला आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. एम.एच. रहांगडाले यांच्या द्वारे –**

३. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही आरोपी माझे नातलग आहे. मला शासनाने

प्लॉट दिला होता, याबाबातचे कागदपत्र मी न्यायालयात दाखल केले आहे. परंतु पोलीसांनी सदरचे कागदपत्र न्यायालयात का दाखल केले नाही, याचे कोणतेही कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्लॉटच्या अनुषंगाने असलेल्या वादाबाबत पोलीसांनी माझ्यावर कार्यवाही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीसांनी लॉक–अप मधे ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावर पोलीसांनी कार्यवाही केली आहे तर आरोपींवर ही कार्यवाही झाली पाहिजे असे मला वाटले, म्हणून मी माझ्या पत्नीला आरोपींविरोधात तक्रार द्यायला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या पत्नीच्या कानावर मारहाण केली अशी घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या विरोधात केलेल्या कार्यवाहीचा बदला घेणेसाठी माझ्या पत्नीने आरोपींविरोधात खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष

मौदा. **स्वाक्षरी/–**

दिनांक १०.१२.२०२५ (एल.एम. पठाण)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग मौदा